# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
## Date – 07 December 2024
## Time 18.10 to 18.20
## Language Marathi
## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर
## प्रादेशिक बातम्या
## दिनांक – ०७ डिसेंबर २०२४ सायंकाळी ६.१०

****

- राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत १०० दिवसीय क्षयरोग मुक्त भारत मोहिमेला प्रारंभ.
- विधानसभेच्या विशेष अधिवेशनात नवनिर्वाचित आमदारांची शपथग्रहण प्रक्रिया सुरू.
- माजी मंत्री मधुकरराव पिचड यांच्या पार्थिव देहावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार.

आणि

- १९ वर्षाखालील पुरुषांच्या आशिया क्रिकेट चषक स्पर्धेत उद्या भारत आणि बांग्लादेश संघात अंतिम सामना.

****

राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत १०० दिवसीय क्षयरोग मुक्त भारत मोहिमेला आजपासून प्रारंभ झाला. हरयाणात पंचकुला इथे, केंद्रीय आरोग्य आणि कुटुंबकल्याण मंत्री जगत प्रकाश नड्डा यांच्या उपस्थितीत या मोहिमेचं उद्घाटन झालं. देशभरात ३४७ जिल्ह्यात तर महाराष्ट्रात १७ जिल्ह्यात ही मोहीम राबवली जाणार आहे.

राज्यात आज वाशिम इथून या मोहीमेस सुरुवात करण्यात आली. केंद्रीय आयुषमंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते या मोहिमेचं उदघाटन करण्यात आलं. या शंभर दिवसांच्या कालावधीत निश्चित केलेल्या कृती आराखड्यानुसार क्षयरोगाचं उच्चाटन करण्यासाठी आरोग्य सेवांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येणार आहे. यासोबतच नि:क्षय पोषण योजनेचा लाभ देण्यासाठी या कालावधीत जनजागृती

करण्यात येणार आहे, अशी माहिती जाधव यांनी दिली. या कार्यक्रमाअंतर्गत राज्यात ११ हजार ६१० नि:क्षय मित्रांची नेमणूक करण्यात आली असून, क्षयरोगाचे रुग्ण तपासणी आणि उपचारपद्धतीमध्ये गती येणार आहे, अशी माहिती आरोग्य आणि कुटुंब कल्याण विभागाचे उपसचिव कौस्तुभ गिरी यांनी दिली.

नांदेड जिल्ह्यात तुप्पा प्राथमिक आरोग्य केंद्रात जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ संगीता देशमुख यांच्या हस्ते या मोहिमेची सुरुवात झाली. यावेळी सरपंच मंदाकिनी यन्नावार, उपसरपंच दत्ता कदम, पोलीस पाटील वसंत पल्लेवाड आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. जिल्ह्यात भोकर ग्रामीण रुग्णालयाच्या बाह्य रुग्ण विभागात रुग्णांना क्षयरोग आणि उपचारांविषयी माहिती देऊन मोहिमेची सुरुवात करण्यात आली. या मोहिमेसाठी आवश्यक साहित्याचं वाटपही यावेळी करण्यात आले. या शंभर दिवसीय मोहिमेत सर्वांनी सहकार्य करण्याचं आवाहन जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी केलं आहे.

****

राज्य विधिमंडळाच्या विशेष अधिवेशनाचा आज पहिला दिवस होता. विधानसभेचे हंगामी अध्यक्ष कालिदास कोळंबकर यांनी कामकाजाला सुरुवात केली. विधानसभा अध्यक्षांची निवड येत्या ९ तारखेला होणार असून यासंदर्भात प्रस्ताव सादर करण्याची वेळ उद्या रविवारी दुपारी बारा वाजेपर्यंत ठरवण्यात आल्याची घोषणा त्यांनी केली. यानंतर चैनसुख संचेती, जयकुमार रावल, माणिकराव कोकाटे आणि आशिष जयस्वाल या सदस्यांना शपथ देण्यात आली. हे चौघे कोळंबकर यांच्यासोबत तालिका अध्यक्ष म्हणून कामकाज पाहतील. त्यापाठोपाठ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांना सदस्यत्वाची शपथ देण्यात आली. इतर आमदारांच्या शपथग्रहणानंतर सभागृहाचं आजचं कामकाज तहकूब झालं. उद्या उर्वरित नवनिर्वाचित आमदारांना शपथ देण्यात येईल.

****

जनभावनेचा आदर करत महाविकास आघाडीतील विधानसभा सदस्यांनी आज शपथ न घेण्याचा निर्णय घेतल्याची माहिती, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस समितीचे अध्यक्ष आमदार नाना पटोले यांनी दिली आहे. ते विधानसभा परिसरात प्रसार माध्यमांशी बोलत होते. विधानसभेच्या निवडणुकीनंतर राज्यात भाजपा महायुतीचे सरकार आलं असलं तरी हे सरकार जनतेच्या मतांचं सरकार नाही,  मारकडवाडीच्या लोकांची

जी भावना आहे, तीच राज्यातील बहुतांश जनतेची भावना असल्याचं मत, पटोले यांनी व्यक्त केलं.

****

ईव्हीएमच्या विषयावर महाविकास आघाडी रडीचा डाव खेळत असल्याची टीका राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केली आहे. आज मुंबई इथं विधानभवन परिसरात ते माध्यमांशी बोलत होते. लोकसभेला ईव्हीएमवर मतदान होऊन महाविकास आघाडीला ३१ जागा मिळाल्या, तेंव्हा ईव्हीएम चांगलं होतं. मात्र विधानसभेत महायुतीच्या बाजुने जनतेने कौल दिला, त्यामुळे ईव्हीएमला दोष देण्यात येत असल्याचं पवार म्हणाले. दरम्यान, महाविकास आघाडीच्या आमदारांना शपथ घेण्याचा उद्याचा शेवटचा दिवस आहे. त्यांना उद्या संध्याकाळपर्यंत शपथ घ्यावीच लागेल, नाहीतर सोमवारी कामकाजात भाग घेता येणार आहे, अशी माहिती पवार यांनी दिली.

****

माजी मंत्री मधुकरराव पिचड यांच्या पार्थिव देहावर आज अहिल्यानगर जिल्ह्याच्या अकोले तालुक्यात राजूर इथं शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पिचड यांचं अंत्यदर्शन घेऊन श्रद्धांजली अर्पण केली. यावेळी आमदार राधाकृष्ण विखे पाटील, आमदार दिलीप वळसे पाटील, आमदार किरण लहामटे, जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांच्यासह समाजाच्या विविध क्षेत्रातल्या नागरिकांनी पिचड यांना श्रद्धांजली अर्पण करून त्यांना अखेरचा निरोप दिला.

****

देशातला इलेक्ट्रिक वाहन उद्योग २०३० पर्यंत सुमारे ४ कोटी रोजगार निर्माण करणारं क्षेत्र बनेल, अशी माहिती केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी दिली. ते आज नागपूर इथं राष्ट्रीय अग्निशमन महाविद्यालयात इलेक्ट्रिक वाहनांमध्ये आगीच्या दुर्घटनांचं व्यवस्थापन या विषयावरच्या कार्यशाळेत बोलत होते. इलेक्ट्रिक दुचाकींना लागणाऱ्या आगीच्या घटना टाळण्यासाठी संरक्षण संशोधन आणि विकास संस्था-डीआरडीओ आणि भारतीय तंत्रज्ञान संस्था-आयआयटीमधल्या तज्ज्ञांच्या समितीनं संशोधन केलं असून एआयएस या सुरक्षा मानांकनानं बॅटरी सुरक्षा सुनिश्चित केल्याची माहिती त्यांनी दिली. इलेक्ट्रिक बसेसमध्ये आगीची सूचना देणारी घंटा लावणं अनिवार्य केलं असल्याचं त्यांनी

सांगितलं. जम्मूमध्ये मोठ्या प्रमाणात सापडलेल्या लिथियमच्या साठ्यांमुळे येत्या काळात लिथियम आयन बॅटरीची किंमत कमी होईल, अशी शक्यताही गडकरी यांनी वर्तवली आहे.

****

सक्तवसुली संचालनालयानं आज अहमदाबाद आणि मुंबईत ७ ठिकाणांवर छापे टाकून साडे तेरा कोटी रुपयांची रोकड जप्त केली. बँक ऑफ महाराष्ट्र आणि नाशिक मर्चंट को-ऑपरेटिव्ह बँकेत असलेल्या खात्यांद्वारे करण्यात आलेल्या बेकायदा व्यवहार प्रकरणी ही कारवाई करण्यात आली.

****

सशस्त्र सेना ध्वज दिनानिमित संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी आज भारतीय सैन्य दलाच्या धैर्य, पराक्रम, समर्पण आणि त्यागाला वंदन केलं. देशवासियांनी सशस्त्र सेना ध्वज दिन निधीत योगदान द्यावं असं आवाहनही त्यांनी केलं.

दरम्यान, लातूर जिल्हा प्रशासनाने गेल्या वर्षी सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलनात उल्लेखनीय कामगिरी करीत मराठवाड्यात प्रथम, तर राज्यात द्वितीय क्रमांक प्राप्त केला होता. या कामगिरीबद्दल आज, सशस्त्र सेना ध्वजदिनी राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते लातूरच्या जिल्हाधिकारी तथा जिल्हा सैनिक कल्याण मंडळाच्या अध्यक्ष वर्षा ठाकूर-घुगे आणि जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी निवृत्त लेफ्टनंट कर्नल शरद प्रकाश पांढरे यांना गौरवण्यात आलं.

****

बालरंगभूमी परिषदेचं पहिलं बालरंगभूमी संमेलनाचं येत्या २० ते २२ डिसेंबर दरम्यान पुणे इथं आयोजन होणार आहे. या संमलेनाच्या अध्यक्षपदी चित्रपट-नाट्य अभिनेते मोहन जोशी असतील, संमेलनाचं उद्घाटन ज्येष्ठ अभिनेते मोहन आगाशे यांच्या हस्ते होणार आहे. बालरंगभूमी परिषदेच्या अध्यक्ष अभिनेत्री नीलम शिर्के-सामंत यांनी आज पुणे इथं वार्ताहर परिषदेत ही माहिती दिली. अखिल भारतीय नाट्य परिषदेचे अध्यक्ष, अभिनेते प्रशांत दामले, अभिनेते सयाजी शिंदे, दिग्दर्शक-अभिनेते सुबोध भावे यांच्यासह नाट्य आणि बालनाट्य क्षेत्रातले ज्येष्ठ कलाकार या संमेलनाला उपस्थित राहणार आहेत. बालकलाकारांची भव्य शोभायात्रा, विविध कलांचं, चित्ररथांचं प्रदर्शन, राज्यभरात गाजलेली बालनाट्यं, लोककलेचं सादरीकरण, दिव्यांगांसाठी काम करणाऱ्या विविध संस्थांच्या बालकलावंतांचे कार्यक्रम यासह विविध कार्यक्रम या संमेलनात होणार आहेत. समारोपाच्या

कार्यक्रमात ज्येष्ठ नाट्यकर्मी प्रतिभा मतकरी यांना बालरंगभूमी पुरस्कारानं गौरवण्यात येणार आहे.

****

अनंत भालेराव प्रतिष्ठानतर्फे दरवर्षी देण्यात येणारा `अनंत भालेराव स्मृती पुरस्कार` उद्या छत्रपती संभाजीनगर इथं माजी पोलिस अधिकारी डॉ.मीरा चड्ढा बोरवणकर यांना प्रदान करण्यात येणार आहे. मुंबई उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती सुनील देशमुख हे या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी असतील. यावेळी डॉ. बोरवणकर यांचं 'पोलीस, राज्यकर्ते आणि समाज–आव्हाने आणि उपाय' ह्या विषयावर व्याख्यान होणार आहे. हा कार्यक्रम मराठवाडा साहित्य परिषदेच्या यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात सायंकाळी साडेपाच ते साडेसात या वेळेत होणार आहे.

****

ऑस्ट्रेलियात ॲडलेड इथं सुरु असलेल्या बॉर्डर–गावस्कर चषक स्पर्धेत आज तिसऱ्या दिवसाचा खेळ संपला तेव्हा भारतीय संघाने आपल्या दुसऱ्या डावात ५ बाद एकशे २८ धावा केल्या आहेत. तत्पूर्वी ऑस्ट्रेलियाचा संघ पहिल्या डावात तीनशे ३७ धावांवर सर्वबाद झाला, काल पहिल्या दिवशी भारतीय संघाचा डाव १८० धावांत संपुष्टात आला होता. दरम्यान, भारताची दुसऱ्या डावाची सुरुवात निराशाजनक झाली असून, भारतीय संघ अद्याप २९ धावांनी पिछाडीवर आहे.

****

दुबई इथं सुरु असलेल्या १९ वर्षाखालील पुरुषांच्या आशिया क्रिकेट चषक स्पर्धेत उद्या भारत आणि बांग्लादेश यांच्यात अंतिम सामना होणार आहे. भारतीय प्रमाण वेळेनुसार सकाळी साडे दहा वाजता या सामन्याला सुरुवात होईल. भारतानं उपांत्य सामन्यात श्रीलंकेला सात गडी राखून नमवून अंतिम फेरीत प्रवेश केला आहे.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषदेच्या वतीने जिल्हयात आज पासून आमचे शौचालय आमचा सन्मान या स्पर्धा घेतली जात आहे. वैयक्तिक आणि सार्वजनिक शौचालयातील पाण्याच्या नळाची सुयोग्य जोडणी, सुरळित आणि सुरक्षित वीज पुरवठा, दरवाजांची कडी, कोंडा, फरशी आणि छत हे सुस्थितीत असणे तसेच शौचालय संबंधित दुरुस्ती, स्वच्छता, रंगरंगोटी, या निकर्षींवर भर देऊन उत्कृष्ट शौचालय निवडले जाणार आहे. स्पर्धत उत्कृष्ट शौचालय ठरलेल्या कुटुंबप्रमुख

तसेच सार्वजनिक उत्कृष्ट शौचालय ठरलेल्या सरपंच आणि ग्राम पंचायत अधिकारी यांचा जिल्हास्तरावर सन्मान करण्यात येणार आहे.

****

सकल हिंदू जनजागरण समिती वतीने छत्रपती संभाजीनगर येत्या मंगळवारी १० डिसेंबरला बांगलादेश हिंदू न्याय यात्रा काढण्यात येणार आहे. बांगलादेशात अल्पसंख्याक हिंदूंवर होत असलेल्या अत्याचारांच्या निषेधार्थ ही न्याय यात्रा काढण्यात येणार असल्याचं, आज यासंदर्भात झालेल्या पत्रकार परिषदेत सांगण्यात आलं.

****